महाराष्ट्र शासन
नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग
विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांचे कार्यालय
औरंगाबाद महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत, टप्पा क्र. 3, पहिल्या मजल्यावरील दक्षिणेकडील दालन
Email ID : slao_splunit@rediffmail.com

---

जा.क्र. विभूसंअ/विघऔ/भूसं/२/२०२०/२४६ दि. २८.०६.२०२२

प्रति,

मा. व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
औरंगाबाद

विषय : **भूसंपादन जिल्हा औरंगाबाद**
मौजे सातारा, गट नं. १२४/२ व १३१ मधील अस्तित्वातील रस्त्याचे २४.० मी. रुंदीकरण (शिवाजीनगर रेल्वेगेट भुयारी मार्ग) भूसंपादन करणेबाबत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसुचना राजपत्रात प्रसिद्ध करणेबाबत

संदर्भ : १. या कार्यालयाचे आपणांस पत्र क्र. विभूसंअ/विघऔ/भूसं/२/२०२०/२३८, दि. २३.०६.२०२२
२. आपले या कार्यालयास पत्र जा. क्र. नियोजन/राजपत्र प्रसिद्धी/२०१७/७६५ दि. २३.०६.२०२२

महोदय,

उपरोक्त मौजे सातारा, गट नं. १२४/२ व १३१ मधील अस्तित्वातील रस्त्याचे २४.० मी. रुंदीकरण (शिवाजीनगर रेल्वेगेट भुयारी मार्ग) भूसंपादन करणेबाबत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसुचना मराठीत प्रसिद्ध करणेसाठी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये पाठविण्यात आली होती.

संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये आपण कळविलेप्रमाणे सदर अधिसुचना पाठवितांना अधिकाऱ्यांची सही व कार्यालयाचा शिक्का आणि मुळ प्रत (हार्ड कॉपी) Page Maker Software मध्ये DVTT-YOGESH टाईप वापरुन मराठी १२ पॉईंट व इंग्रजी १० पॉईंट बोल्डमध्ये तयार करुन ते पेनड्राईव्ह मध्ये मुद्रणालयास पाठविण्यात येत आहे.

**उक्त भूसंपादन प्रकरणी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL ९६/२०१३) दाखल आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कार्यवाही तातडीने होणे अभिप्रेत आहे.**

मनपा/औ/नरवि/ससंनर/आ.क्र.G/611
दि.28/06/2022

जा.क्र./मनपा/संगणक कक्ष/ 101/2022
दिनांक: 1/7/2022

Land Acquization

सदर अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करावी व अधिसुचना प्रसिद्ध केल्याबाबत राजपत्राच्या कार्यालयास त्वरीत पाठविण्यात याव्यात ही विनंती.

आपला,

(वि.भा.दहे)
विशेष भूसंपादन अधिकारी
विशेष घटक, औरंगाबाद

सहपत्र : अधिसुचनेची प्रत

प्रत माहितीस्तव सादर :

१. मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद

२. मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद

प्रत कार्यवाहीस्तव :

३. मा. व्यवस्थापक, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC),जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना अधिसुचनेची प्रत देवून विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेली अधिसुचना शासकीय संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

४. मा. उपसंचालक, नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिसुचनेची प्रत देवून विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेली अधिसुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

कलम ११ प्रारुप प्रसिध्दीकरण

अधिसुचना

विशेष भूसंपादन अधिकारी,
विशेष घटक, औरंगाबाद
महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत,
टप्पा क्र.३, पहिल्या मजल्यावरील
दक्षिणेकडील दालन, औरंगाबाद.

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुनःस्थापना आणि पुनर्वसन अधिनियम, २०१३

क्रमांक २०२२/विभूसंअ/विघऔ/भूसं/२/२०२०. ज्याअर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त अधिसुचना** असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाचा कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, औरंगाबाद जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात पुढे जिचा निर्देश **उक्त जमीन** असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त **सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतूदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचा विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसुची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम-४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्याप्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतूदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापूढे ज्यांचा निर्देश **उक्त नियम** असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद. (औरंगाबाद महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत, टप्पा क्र.३, पहिल्या मजल्यावरील दक्षिणेकडील दालन, औरंगाबाद) यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

जमिनीचे वर्णन

गाव : सातारा　　तालूका : औरंगाबाद　　जिल्हा : औरंगाबाद

| अ.क्र. | गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | १२४/२ पैकी | ००.११.५० |
| २ | १३१ पैकी | ००.०५.७८ |
| | एकूण | ००.१७.१८ |

**अनुसूची - दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : शिवाजीनगर रेल्वेगेट ते बीडबायपास पर्यत अस्तित्वातील रस्ता २४.० मी. रुंद करणे.

प्रकल्प कार्याचे वर्णन : रस्ता रुंदीकरण करुन भुयारी मार्ग (Under pass) करणे.

समाजाला मिळणारे लाभ : वाहतूक भार नियमन.

**अनुसूची - तीन**

बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

**अनुसूची - चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक : १३.०३.२०१५ व २६.०४.२०१८ अनुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण II व III मधील तरतूदी लागू करण्यापासून सुट प्राप्त.

**अनुसूची - पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-

अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- निरंक

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील :- निरंक

टीप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत, टप्पा क्र.३, पहिल्या मजल्यावरील दक्षिणेकडील दालन, औरंगाबाद यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : २३/०६/२०२२
ठिकाण : औरंगाबाद.

(विश्वनाथ दहे)
विशेष भूसंपादन अधिकारी
विशेष घटक, औरंगाबाद